# विद्यार्थ्यांकडून बुलेट ट्रेनच्या प्रकल्प स्थळाचा अभ्यास

## तंत्रज्ञानातील गुंतागुंत घेतली जाणून ; गुजरातमधील पारुल विद्यापीठाचा उपक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. १३ : मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचा मुंबई महानगर प्रदेशातील (एमएमआर) बहुतांश मार्ग भुयारी आहे. त्याच्या खोदकामासाठी ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चरकडून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. हा प्रकल्प म्हणजे अभियांत्रिकी कामाचा उत्कृष्ट नमुना असल्याने त्याचा अभ्यास करण्यासाठी गुजरातमधील पारुल विद्यापीठाच्या ३० हून अधिक अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच विक्रोळी येथील प्रकल्प स्थळाला भेट देत पाहणी केली.

मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल्वे प्रकल्पाच्या (बुलेट ट्रेन) सी-२ पॅकेजमध्ये गुंतागुंतीचे काम असून, ते ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चरकडून यशस्वीपणे पार पाडले जात आहे. त्या पार्श्वभूमीवर या कामातील आव्हाने जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी या ठिकाणी भेट देत तेथील अभियंत्यांशी संवाद साधून प्रकल्पातील तांत्रिक व व्यवस्थापकीय गुंतागुंतीची माहिती जाणून घेतली. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी बांधकामातील आव्हाने, कार्यपद्धती आणि देशाच्या पहिल्या बुलेट ट्रेन प्रकल्पात वापरल्या जाणाऱ्या नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाविषयी सविस्तर चर्चा केली. तसेच ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चरचे कार्यकारी उपाध्यक्ष संदीप देसाई, मुख्य जोखीम व्यवस्थापन अधिकारी अरुण देवरे, प्रकल्प संचालक सुनील त्यागी यांच्याशी चर्चा केली.



मुंबई : बुलेट ट्रेन प्रकल्पाची माहिती घेताना विद्यार्थी.